Sunil/VM
Article

# Amruta Karkare

# भूमीपुत्राचं जाणं

समाजासाठी आदर्शवत ठरलेल्या काही व्यक्तींपैकी भंवरलाल जैन होते. नुकतेच त्यांचे निधन झाले. त्यांच्या कार्यसंस्कृतीची ओळख व्हावी, त्यातून नव्या स्टार्ट अप च्या जमान्यातील उद्योजकांनी प्रेरणा घ्यावी आणि त्यांना भावनापूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी वाहिलेले हे शब्दपुष्प

**भूमीपुत्राचं जाणं**

मोठे भाऊ अर्थातच भंवरलालजी जैन यांना जळगावांत भेटण्याचा बरेचदा योग आला. काही वर्षांपूर्वी जैन हिल्स वर त्यांच्याशी झालेली भेट आजही माझ्या लख्ख आठवणीत आहे. अवघ्या जगाला ललामभूत ठरलेल्या आणि त्यांना भेटलेल्या काही थोर व्यक्तींसंबंधी त्यांना अनुबोधपट ( डॉक्युमेन्टरी) तयार करायचा होता. त्यावेळी त्यांच्याबरोबर झालेल्या दोन-एक तासांच्या चर्चेतून मला उमजलेले भाऊ हे त्यांच्या बहुश्रुत व्यक्तिमत्वाचा एक कोपरा होता. कायम शुभ्रधवल वेषभूषा, सोनेरी फ्रेमच्या आडून त्यांच्या उद्यमशीलतेची ग्वाही देणारे डोळे, सौम्य, मवाळ हसरा चेहरा आणि समोरची व्यक्ती कितीही लहान असली तरी तिला मानसन्मानाने वागवण्याची वृत्ती हे त्यांच्या स्वभावाचे पैलू  मला त्यावेळी प्रकर्षाने जाणवले होते.

खरं तर, त्यावेळी मी जळगावातील एका ओसाड टेकडीवर भाऊंनी स्वकर्तृत्वाने, स्वकष्टार्जित उभारलेले जैन हिल्स हे साम्राज्य पहायाला गेले होते. त्याकाळी भाऊंचा दिवसातील बराचसा वेळ तेथेच मुक्काम असायचा. काही वषार्पूर्वी मी पाहिलेला तो परिसर आणि आताची जैन हिल्सची वास्तू दिमाखात उभी असलेला परिसर यात जमीन- अस्मानचा फरक होता. सर्वच थक्क करणार होतं. चहूबाजू डौलात उभी असलेली पिकं, बहरलेली वनराई, आपल्याच आगतस्वागतासाठी जणू हात जोडून उभे असलेले बागबगीचे, ते सदाबहार राहण्यासाठी एका कोपऱ्यात उभा असलेला खत कारखाना, बायोगॅस प्रकल्प, दुसऱ्या एका कोपऱ्यात केळीचं उतिसंवर्धन ( टिश्यू कल्चर) करणारी प्रयोगशाळा, त्यातील टेस्टट्यूबमध्ये शिस्तीत उभी असलेली केळांची इवलीशी रोपं, थोडं आणखी समोर गेल्यावर दिसणारा कांदा निर्जलीकरण विभाग, त्याच्याच बाजूचा फळांचा रस काढणारा अत्याधुनिक यंत्रसामुग्रीने परिपूर्ण असलेला विभाग. हे सर्व पाहिले की हाच का तो पूर्वीचा डोंगर असा प्रश्न पडतो.



भारताची कृषीप्रधान अर्थव्यवस्था आणि तिचा कणा असलेला शेतकरी हे नेहमीच भाऊंच्या केंद्रस्थानी होते. त्यांची आई, गौराबाई यांनी लहानपणी त्यांच्यावर असे संस्कार केले होते. या भूतलावावरील मुंग्या, किटकांपासून ते माणसापर्यंत सर्वांचे पोट भरेल असा तू व्यवसाय कर हे त्यांच्या मनावर बिंबवले होते. मी भेटले तेव्हा त्यांच वय साधारणपणे साठीच्या आसपास असेल. पण त्यांच हिलवर असणं, स्वत: कारभारावर देखरेख ठेवणं याचच मला खूप अप्रूप वाटायचं. त्यांच्याबरोबर हिलवर मारलेल्या फेरफटक्याने या शेतकरी मित्राचं कृषीप्रेम, शेतकऱ्याविषयीचा जिव्हाळा, भविष्यातील पाणीटंचाईचा विचार करून इस्त्रायलच्या सहकार्याने भारतात सर्वप्रथमच कार्यान्वित केलेली ठिबक सिंचन योजना, तेथील हरितगृहे, जगभरातून येणाऱ्या कृषीविषयक शिष्टमंडळांसाठी बांधलेली पंचतारांकित आणि त्यांना  आपली आई, वडील, पत्नीच्या स्मृतीप्रीत्यर्थ नांव दिलेली छोटी छोटी बंगलीवजा घरे. आणखी एक महत्वाची वास्तू म्हणजे गांधीतीर्थ ( ही वास्तू अलिकडच्या काळातील) हे सर्व पाहिले की भाऊंमधील सामान्यात्वातील असामान्यत्व अधोरेखित होतं. विशेष म्हणजे या वास्तूकरीता वास्तूविशारदाला राष्ट्रपती पुरस्कार मिळाला आहे.

जैन हिल्सच्या परिसरात दूरदूरवर कुठेही नजर गेली तरी तेथपर्यंत या शेतकरी मित्राचे कृषीप्रेमच ठळकपणे नजरेत भरते. भविष्यातील पाणीटंचाईचा वर्तमानातच वेध घेऊन दूरदृष्टीने त्यांनी आणलेली ठिबक सिंचन योजना, एका व्यवसायासाठी पूरक ठरणाऱ्या  दुसऱ्या व्यवसायातून उत्पादन निर्मिती, जैविक खतनिर्मितीचा स्वतंत्र प्रकल्प सर्व पाहू जाता भाऊंची उद्यमशीलता प्रकर्षाने  लक्षात येते. त्यावेळी भाऊंनी स्वत: माझ्याबरोबर फिरून कष्टसाध्य मिळवलेले यश मला दाखवलं होतं. भाऊंची येथपर्यंतची यशस्वी वाटचाल खरोखरच प्रेरणादायी वाटली. या खडतर वाटचालीतच त्यांना मिळालेल्या अमेरिकेच्या CRAWFORD REID MEORIAL AWARD सह भारताचा पद्मश्री पुरस्कारापर्यंत शेकडो राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी त्यांची कार्यसिद्धता दाखवून दिली आहे.




जळगाव जिल्ह्यातील वाकोद या खेडेगावात ६ डिसेंबर १९३७ रोजी जन्मलेल्या भाऊंनी एका ढकलगाडीतून रॉकेल विक्रीचा व्यवसाय सुरु करून उद्योगव्यवसायाची मूहूर्तमेढ रोवली. तीन पिढ्यांची एकूण बचत असलेल्या अवघ्या ७ हजार रुपयांच्या तुटपुंज्या भांडवलाच्या बळावर भव्यदिव्य स्वप्न पाहिली आणि ती साकार करून दाखवली. दरम्यानच्या काळात बी.कॉम, एल.एल.बी केले. काळाचे चक्र फिरतं होते, त्याबरोबर भाऊंचे उद्योगसाम्राज्यही विस्तारत होतं. या विस्ताराला एक भक्कम पाया होता तो म्हणजे त्यांची गुणग्राहकता, सचोटी, पारदर्शकता आणि विनम्रता. या सर्व कसोट्यांवर खरं उतरलेल्या भाऊंनी हळूहळू दुचाकी, ऑटोरिक्षा, ऑटोमोबाईल ॲक्सेसरीजची डिलरशीप मिळवली खरी परंतू, त्यांची नाळ खऱ्या अर्थाने जुळली होती ती कृषीक्षेत्राशीच.

भारताची अर्थव्यवस्था कृषिप्रधान आहे आणि त्याला शेतीव्यवसायातच भविष्य आहे हा त्यांचा ठाम विश्वास होता. त्याआधारावरच ते व्यवसायातील एकएक प्रमेय सोडवत गेले. आधुनिक पद्धतीने शेती व्यवसायाची कास धरायची तर त्यासाठी लागणारी खते, बियाणे, किटकनाशके ट्रॅक्टर, स्प्रिंकलर, पी.व्ही.सी पाईप आणि इतर शेतकी अवजारे, आदींचा शेतीपूरक व्यवसाय सुरु केला. शेतीउत्पादनांवर निरनिराळे प्रयोग करून तऱ्हेतऱ्हेची वाणं विकसीत करणे, पडिक जमिनीचा विकास करून तिला सुपीक बनवणे, माती आणि जलसंवर्धनाचे परवडणारे आणि परिणामकारक व्यवस्थापन याची रुजवात भाऊंनी पुढच्या पिढीतही केली. विदेशी संशोधकांच्या सहकार्याने केळीचे उति संवर्धन ( टिश्यू कल्चर) चे प्रणेते भाऊ होते. शेतीव्यवसायात आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञानाची कास धरल्यामुळे भाऊंचे कर्तृत्व दिवसेंदिवस उजळतच गेले.

व्यवसायाचा श्रीगणेशा करताना त्यासाठी लागणारे **नो–हाऊ** माहित असणे ही पहिली पायरी आहे. आपली उत्पादने, त्यांची भविष्यातील गरज, ग्राहकांची मानसिकता, बाजारपेठेतील स्पर्धक, आणि त्याहूनही महत्वाचे म्हणजे उत्पादित मालाचे विपणन या सर्वांवर कोणत्याही उद्योगाचा आर्थिक डोलारा उभा असतो, त्याचे आडाखे आधीच बांधावे लागतात, गरजेनुसार त्यात बदलही करावे लागतात. हे आडाखे बांधण्यासाठी आवश्यक असलेली दूरदृष्टी आणि धोरणी वृत्ती त्यांच्याकडे होती. याचं उदाहरण म्हणजे १९७८ मध्ये त्यांनी केळीची भुकटी बनवणारी कंपनी विकत घेतली, त्यानंतर पपेन चा आजारी कारखाना. शेतीवर आधारित उद्योगव्यवसायातील भाऊंचे ते पहिले निर्याताभिमुख औद्यगिक धाडस ठरले. बऱ्याच वर्षांपूर्वी जळगाव जिल्ह्याला भीषण पाणीटंचाईने ग्रासले होते. आठवड्यातून एकदा पाणी, लोकांनी आपली दिनचर्या पाणी येण्याच्या वेळेनुसार ठरवणे ही नित्याचे झाले होते. तेव्हाची पाणीटंचाई भविष्यात किती रौद्र रुप घेऊ शकते

हे भाऊंच्या दूरदृष्टी धोरणाने ओळखले होते. दरम्यानच्या काळात जैन उद्योग समूहाने पी.व्ही.सी. पाईप उद्योगात घट्ट पाऊल रोवले होते. परंतू आधीच पाणीटंचाई, त्यातून शेतात पाईपमधून होणारी गळती अशी दुहेरी समस्या भेडसावू लागल्यानंतर भाऊंच्या कल्पकतेतून भारतात सर्वप्रथम आली ठिबक सिंचन योजना. पाणीबचत आणि उत्पादनवाढीमुळे ही योजना शेतकऱ्यांसाठी वरदान ठरली. गळतीमुळे होणारे पाण्याचे बाष्पीभवन, जमिनीची धूप थांबली आणि पिकांना त्यांच्या तहानेनुसार पाणी देण्याची व्यवस्था अस्तित्वात आली. ही योजना सिंचनक्षेत्रातील तो एक मैलाचा दगड ठरला. या नव्या तंत्रज्ञानाने भारताच्या कृषीक्षेत्राला जगाच्या नकाशावर अढळ स्थान प्राप्त करून दिले.

केळीचे उति संवर्धन हा प्रयोगही भाऊंच्या नवीनतेचा स्वीकार करण्याचे एक आदर्श उदाहरण ठरले. देशातील एकूण केळी उत्पादनापैकी निम्मे उत्पादन हे ( सुमारे एक लाख तीस हजार हेक्टर क्षेत्र) महाराष्ट्रात आणि त्यातही निम्म्याच्यावर जळगाव जिल्ह्यात होते. उति संवर्धनाच्या प्रयोगामुळे एका वाणाची, एका उंचीची, एका आकारचे केळी उत्पादन शक्य झाले. जैन हिलवर असलेली ही प्रयोगशाळा बघितली तर **कल्पना कणापरी ब्रम्हांडाचा भेद करी** या त्यांच्या ब्रीदवाक्याची प्रत्यक्ष अनुभूती येते. पाणी व्यवस्थापनासाठी भाऊंनी जोखीम हाताळण्याचे तंत्रज्ञान आत्मसात केले. प्रचंड उन्हाळा असलेल्या जळगावसारख्या शहरातील नैसर्गिक स्त्रोताचा उपयोग करून घेऊन शेतीपूरक व्यवसाय सुरु केले. त्यात कांदा निर्जलीकरण, सौर उर्जेवर चालणारे कृषीपंप, दिवे, पाणी गरम करणारे सौरबंब आदींचे उत्पादन सुरु झाले. मोजूनमापून धोका पत्करून उत्पादन कसे वाढवायचे यावर सतत चिंतन , मनन करण्याची त्यांची स्वत:ची अनोखी आणि आदर्श कार्यसंस्कृती त्यांनी विकसीत केली  होती.

भाऊ विचारवंत होते, लेखक होते, तत्वज्ञानी होते, शेतकऱ्यांचे मार्गदर्शक पाईक होते. लोकांचं भलं चिंतणारे , समाजसेवेवर मनापासून प्रेम करणारे , सातत्याने नाविन्याचा ध्यास घेतलेले एक विद्यार्थीही होते. त्यांच्या या अष्टपैलू व्यक्तिमत्वामुळे भाऊ इतरांचे प्रेरणास्त्रोत बनले.



05.05.2008

भाऊंची स्वप्न मोठी होती. किंबहुना मोठीच स्वप्न बघा यासाठी ते आग्रही असतं. ही स्वप्न साकारण्यासाठी स्थानिक अर्थव्यवस्थेचा अभ्यास करून आणि नैतिकतेशी बांधीलकी जपून केलेला उद्योगविस्तार हा त्यांचा स्वभावधर्मच म्हणायला हवा. टाटा-बिर्लांसारखे उद्योजक अमुक एक गोष्ट करू शकतात तर मी का नाही, अमेरिकेसारखा देश तमुक एका गोष्टीत प्रगती करू शकतो तर मी येथे माझ्या देशात का नाही करू शकत. या त्यांच्या वैचारिक ध्येयासक्तीतच त्यांच्यातील उद्यमशीलतेचा प्रेरणास्त्रोत सामावलेला होता आणि त्या प्रेरणेतूनच आलेली भाऊंची  कृतीशीलता आणि कार्यसंस्कृती जनसामान्यांवर प्रभाव पाडायची.

जवाहरलाल नेहरू हे त्यांचे राजकारणातील तर जे.आर.डी. टाटा हे उद्योगजगतातले हिरो होते. साहित्यिक ना.धो. महानोर, शिल्पकार सुधीर देशपांडे यांच्यापासून ते दिग्दर्शक जब्बार पटेल, शरद पवार, न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्यासारख्या अनेक दिग्गजांमध्ये त्यांची उठबैस होती. प्रत्येक व्यक्तीचे स्वत:चे एक मूल्य असते आणि त्यावरून त्या व्यक्तीची ओळख पटते यावर गाढ विश्वास असणाऱ्या भाऊंना संपर्कातील व्यक्तींचे गुण-दोष ओळखण्याची दैवी देणगीच होती.

त्यांच्या  मनात खोलवर रुजलेला गांधीवाद, साहित्य, समाजकारण, शिक्षणाची आसोशी त्यांना स्वस्थ बसू द्यायची नाही. हिलवर त्यांनी उभारलेले **गांधीतीर्थ** ही देखणी वास्तू देशविदेशातील पर्यटकांना  आकर्षित करते. एवढ्या मोठ्या पसाऱ्यातून भाऊंनी जपलेली आणि वृद्धिंगत केलेली साहित्यिक जाण त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांमधून प्रत्ययास येते. एकत्र कुटुंबाचे आणि वैचारिक प्रगल्भता असलेली  सहचारिणी असली की कुटुंबाची भरभराट होते हा त्यांचा विश्वास होता. त्यांनी लिहिलेले

**अ टेलिंग टेल,  ती आणि मी, युनायटिंग बॉन्ड, देन ॲन्ड नाऊ** ही इंग्रजी तर **आजची समाजरचना, तिंचे स्वरुप वा पुर्नबांधणी, मुरलेलं लोणचं हे भाउंचे मौलिक विचारांचे पुस्तक, ती आणि मी** हि मराठी पुस्तकं याची उदाहरणं देता येतील. विद्यार्थ्यांना व्यवसायपूरक आणि विज्ञानदृष्ट्या सक्षम बनवणारे शिक्षण मिळावे या मताचे ते होते. या विचारातूनच जैन हिलच्या समोरच्या टेकडीवर असलेल्या **अनूभूती** ( डिव्हाईन पार्क) या शाळेचा जन्म झाला. या शाळेत देशभरातून मुले शिकायला येतात. निसर्गरम्य वातावरणात मुलं शिक्षणाचे धडे गिरवतात, शाळेचा संपूर्ण कारभार सौर उर्जेवर चालतो आणि मुख्य म्हणजे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना तेथे विकसीत केलं जातं. अलिकडेच या शाळेला **ग्रीन स्कूल** ॲवॉर्ड मिळालं आहे



भाऊंच्या व्यक्तिमत्वाचा आणखी एक पैलू तर मी आमच्या नातलगांच्या विवाह समारंभात अनुभवला होता. वधू पक्षाकडून त्यावेळी असलेल्या भाऊंनी आपली प्रतिष्ठा, समाजातील मोठेपण, त्यांना मिळणारा

मानमरातब बाजूला ठेवून चक्क पै-पाहुण्याची विचारपुस्त, त्यांना हवे-नको ते पाहणे, अगदी पंक्तीत पाणी वाढण्याचे काम केलेले भाऊ आजही आठवतात. एखाद्या कामगाराच्या घरी कोणी आजारी असेल तर उपचारासाठी पैसे पाठव, स्वत:च्या सुसज्ज रुग्णवाहिका, गाड्या पाठव, काही बरवाईट झालंच तर अगदी अंत्यसंस्काराची जबाबदारीही जैन उद्योगसमूहाने अनेकांच्या बाबतीत घेवून समाजाचे ऋण फेडले आहे. हेच संस्कार त्यांनी पुढच्या पिढीतही रुजवले आहेत. सहचारिणी कांताबाई यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांनी चालवलेले भंवरलाल आणि कांताबाई बहुउद्देशीय प्रतिष्ठान, जळगावजवळच बांधलेला कांताई बंधारा, पद्मालय तीर्थस्थळाच्या जीर्णोद्धारापासून ते अगदी शहरात होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांना सढळ हस्ते त्यांनी केलेली मदत हे सर्व त्यांच्या दातृत्वाचीच साक्ष देतात. त्यांचा पाठीवर ठेवलेला आश्वासक हात नेहमीच मनाला उभारी देणारा असायचा.



समोरची व्यक्ती मानाने, शिक्षणाने, अनुभवाने कितीही छोटी असली तरी तिला योग्य प्रशिक्षण देऊन आपल्यापेक्षा मोठं करण्याचा आजकाल दुर्मीळ होत चाललेला आदर्श भाऊ समाजासमोर ठेवून गेले आहेत. अनेक आघाड्यांवर त्यांचे संघ नेतृत्व ठळकपणे नजरेत भरते. आजच्या भारताला स्वप्रगतीसाठी असा नेतृत्वाबरोबर गुणात्मक शिक्षणाची गरज त्यांच्यातील द्रष्ट्या उद्योजकाने कधीच ओळखली होती. म्हणूनच ते साक्षात्कारी उद्योजक ठरले. स्थानिक जनतेशी कृतज्ञ राहिल्यामुळे समाजाचा आदर्श ठरले शिवाय शेतीला आधारभूत मानून , उत्तेजन देऊन, पुढील पिढीसमोर शेतीव्यवसाय कसा करायचा याचे उदाहरण ठेवून गेले आहेत. जैन उद्योगसमूहाच्या देशविदेशात शाखा असताना त्यांनी कंपनीचे मुख्यालय मात्र जळगावातच ठेवून अखेरपर्यंत आपल्या मातीशी बांधीलकी जपली.

काही व्यक्ती या जन्मानेच मोठ्या असतात. काहींवर मोठेपणा थोपवला जातो. पण काहीजण त्यांच्या कर्तृत्वाने मोठे होतात. या तिसऱ्या वर्गात भाऊ यायचे. त्यांची उद्यमशीलता, त्याला असलेली कठोर परिश्रमांची जोड आणि अगदी जवळून अनुभवलेल्या गरिबीमुळे श्रीमंती आल्यानंतरही जमिनीवरच टिकलेले त्यांचे पाय यामुळे भाऊ होते त्यापेक्षा वेगळ्या उंचीवर जाऊन पोहोचले होते. चंदनाचे खोड हळूहळू झिजत जाते, कापराचा सुगंधही हवेत विरून जातो परंतू, भाऊंसारख्या व्यक्ती आणि त्यांची जीवनगाथा अत्तराच्या कुपीप्रमाणे असते, अत्तराचे अस्तित्व लोपले तरी सुगंध दरवळतच राहतो. भाऊंच्या जाण्याने ही अत्तराची कुपी रिक्त झाली असली तरी त्यांच्या कार्यसंस्कृतीचा दरवळ कायम राहणार आहे. त्यांची जीवनगाथा काळरुपी वाळूपटलावर कायमच आपलं अस्तित्व जागतं ठेवणार आहे. चार वेळा हृदयिकाराच्या झटक्यांमुळे इस्पितळात दाखल झालेले भाऊ नेहमी परत आले परंतू यावेळेस मात्र देवाच्या मनात काही वेगळंच होतं, आयुष्यभर ज्या भूमीशी बांधीलकी जपली त्या भूमीतच ते कायमचे विसावले.

समोरची व्यक्ती मानाने, शिक्षणाने, अनुभवाने कितीही छोटी असली तरी तिला योग्य प्रशिक्षण देऊन आपल्यापेक्षा मोठं करण्याचा आजकाल दुर्मीळ होत चाललेला आदर्श भाऊ समाजासमोर ठेवून गेले आहेत. अनेक आघाड्यांवर त्यांचे संघ नेतृत्व ठळकपणे नजरेत भरते. आजच्या भारताला स्वप्रगतीसाठी असा नेतृत्वाबरोबर गुणात्मक शिक्षणाची गरज त्यांच्यातील द्रष्ट्या उद्योजकाने कधीच ओळखली होती. म्हणूनच ते साक्षात्कारी उद्योजक ठरले. स्थानिक जनतेशी कृतज्ञ राहिल्यामुळे समाजाचा आदर्श ठरले शिवाय शेतीला आधारभूत मानून , उत्तेजन देऊन, पुढील पिढीसमोर शेतीव्यवसाय कसा करायचा याचे उदाहरण ठेवून गेले आहेत. जैन उद्योगसमूहाच्या देशविदेशात शाखा असताना त्यांनी कंपनीचे मुख्यालय मात्र जळगावातच ठेवून अखेरपर्यंत आपल्या मातीशी बांधीलकी जपली.

काही व्यक्ती या जन्मानेच मोठ्या असतात. काहींवर मोठेपणा थोपवला जातो. पण काहीजण त्यांच्या कर्तृत्वाने मोठे होतात. या तिसऱ्या वर्गात भाऊ यायचे. त्यांची उद्यमशीलता, त्याला असलेली कठोर परिश्रमांची जोड आणि अगदी जवळून अनुभवलेल्या गरिबीमुळे श्रीमंती आल्यानंतरही जमिनीवरच टिकलेले त्यांचे पाय यामुळे भाऊ होते त्यापेक्षा वेगळ्या उंचीवर जाऊन पोहोचले होते. चंदनाचे खोड हळूहळू झिजत जाते, कापराचा सुगंधही हवेत विरून जातो परंतू, भाऊंसारख्या व्यक्ती आणि त्यांची जीवनगाथा अत्तराच्या कुपीप्रमाणे असते, अत्तराचे अस्तित्व लोपले तरी सुगंध दरवळतच राहतो. भाऊंच्या जाण्याने ही अत्तराची कुपी रिक्त झाली असली तरी त्यांच्या कार्यसंस्कृतीचा दरवळ कायम राहणार आहे. त्यांची जीवनगाथा काळरुपी वाळूपटलावर कायमच आपलं अस्तित्व जागतं ठेवणार आहे. चार वेळा हृदयिकाराच्या झटक्यांमुळे इस्पितळात दाखल झालेले भाऊ नेहमी परत आले परंतू यावेळेस मात्र देवाच्या मनात काही वेगळंच होतं, आयुष्यभर ज्या भूमीशी बांधीलकी जपली त्या भूमीतच ते कायमचे विसावले.

**भाऊंवर पहिल्या हृदय शस्त्रक्रियेपूर्वी त्यांनी जैन उद्योगसमूहाच्या कामगारांसमोर केलेल्या भाषणाचा काही अंश**

ज्यांनी माझ्याबरोबर केरोसिनच्या टाक्या ढकलल्या, फाटलेल्या डब्यातून केरोसिनची गळती थांबावी म्हणून डब्यांना साबण लावला त्या सर्वांचा मी ऋणी आहे. गॅससिलिंडर विकण्यासाठी हातगाडीबरोबर सेवक चालायचा आणि त्या गाडीवर सिलिंडर आणि शेगडी घेऊन मी दारोदार फिरायचो. मित्रहो, पैशाचं सोंग आणता येत नाही, गाठीशी पैसा नसला तर काय होतं याचा तुम्ही नेहमीच अनुभव घेत आला आहात. ५०० रुपये मागण्यासाठी मी जळगावच्या तिजोरी गल्लीत अनेकदा फिरलो. माझ्याबरोबर तेव्हा असायचे नूर महंमद चाचा . त्यांच्या ऋणातून मी कधी मुक्त होईन माहित नाही पण शेख चाचा यांच्या नावाने कनिष्ठ महाविद्यालय सुरु करून मी तसा अल्पसा प्रयत्न केला आहे. आयुष्याची पहिली १८ वर्षे मी भाड्याच्या घरात राहिलो, त्यानंतरची ७ वर्षे दुसऱ्या भाड्याच्या घरात काढली तब्बल २५ वर्षे भाड्याच्या घरात राहिलो. त्या काळात जे कमवलं ते व्यवसायात ओतलं. दिवसेंदिवस मुंबईत जैन उद्योग समूहाचा कारभार वाढत होता. पण मुंबईत घर घेण्याची हिम्मत करू शकलो नाही. जेव्हा मनात विचार यायचा तेव्हा घरांच्या किंमती वाढलेल्याच असायच्या. कोण्या एका कवीनं म्हटलं आहे ना की ,

**प्रत्येकाला एक आभाळ असावं, कधी वाटलं तर भरारी मारण्यासाठी**

**प्रत्येकाला एक घरटं असावं संध्याकाळी परतण्यासाठी**

या काव्यपंक्ती कायम मनात घोळत असतात. त्या काळात मला ज्यांनी साथ दिली त्या सर्वांचा मी ऋणी आहे. आपल्या कंपनीच्या कोणत्या उणीवा आहेत, त्या दूर करण्यासाठी कोणते प्रयत्न करणे गरजेचे आहे, ते प्रयत्न यशस्वी होण्यासाठी कोणत्या दिशेने कोणत्या वेळी वाटचाल करावी लागेल हे ठरवायचे आहे. हो, पण त्यासाठी तुम्हाला घड्याळाकडे बघणं थांबवाव लागेल. ज्या दिवशी हे साध्य होईल त्यादिवशी आपल्या कार्यसंस्कृतीचा  अर्थ नव्याने उलगडला जाणार आहे. आणि ही कार्यसंस्कृती तुम्हाला शिकवली जावी हे माझे उद्दिष्ट आहे. ही कार्यसंस्कृती आत्मसात करताकरता तुम्हाला स्वत:च्या अंगी शिस्त बाणवावी लागणार आहे. ही शिस्त बाणवताना दुसऱ्याशी तुलना करू नका. दुसऱ्याशी तुलना करून जगणारे लोक सेकंडहॅन्ड असतात. आपण आपली कंपनी स्वत:च्या हाताने, मनाने, बुद्धिने, मनगटातील ताकदीने, परिश्रमाने चालवत आहोत. या प्रवासात सगळ्यांचे अश्रू मी एकटा पुसू शकेन असा अनाठायी दावा मी कधीच करणार नाही. त्यासाठी मी सक्षम यंत्रणा उभी करण्याचा प्रयत्न करतो आहे. पैशाच्या बदल्यात मी कामाचा, परिश्रमाचा आणि वैभवाच्या जागी जबाबदारीचा वारसा सोडून जाणार आहे. तो जतन करण्याचे उत्तरदायित्व तुमच्यावर आहे. ईश्वरइच्छेने काही बरेवाईट झालेच तर तुम्ही दु:ख्ख करू नका, सुटी घेऊ नका, काम करा, माझ्या जीवनाचं अंतिम ध्येय तेच आहे. मी परत येणार आहे. खरं तर ऑपरेशनसाठी अमेरिकेत जायची इच्छा नव्हती, परंतू जळगावच्या डॉक्टरांनी आग्रह धरला आहे म्हणून तिकडे जातोय. पण मी लवकरच ठणठणीत होऊन परतणार आहे आणि तुमच्याबरोबर कामाला लागणार आहे याची खात्री बाळगा.

अमृता करकरे

amruta.karkare@expressindiacom

March 8, 2016 Leave a comment

Proudly powered by WordPress